॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/६/प्रवेश व पात्रता विभाग/५५/२०२५ दि.०२.०७.२०२५

परिपत्रक क्र.३९/२०२५

प्रति,

**मा.प्राचार्य**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी

संलग्नीत सर्व पदव्यूत्तर कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालये यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये **विना अनुदानित** एम.एस्सी **( सर्व विषय )** / एम.ए. (भूगोल) अभ्यासक्रमांना प्रथम वर्षात दहा पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित झाल्यास त्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठ प्रशाळांमध्ये वर्ग करण्याबाबत.

वरील विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, एम.एस्सी **( सर्व विषय )** / एम.ए. (भूगोल) **विना अनुदानित** अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्षात दहा पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशीत झाल्यास त्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठ प्रशाळांमध्ये वर्ग करण्याबाबत मा.अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विद्या परिषद सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आली होती.

त्या अनुषंगाने विद्या परिषद सभेने क.ब.चौ.उ.म.वि संलग्नीत महाविद्यालयात विना अनुदानीत एम.एस्सी ( सर्व विषय ) / एम.ए. ( भूगोल ) अभ्यासक्रमांना प्रथम वर्षात दहा पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित झाल्यास त्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठ प्रशाळांमध्ये वर्ग करण्यास मान्यता दिली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सुध्दा आपल्या महाविद्यालयात विना अनुदानित **एम.एस्सी ( सर्व विषय ) / एम.ए. (भूगोल)** अभ्यासक्रमांना प्रथम वर्षात दहा पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित झाल्यास महाविद्यालयांतील विद्यार्थी जवळच्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठ प्रशाळांमध्ये वर्ग करावेत.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

डॉ.विनोद प्र.पाटील

( **कुलसचिव** )

**प्रत माहितीसाठी :**

१.मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.

२.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.

३.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.

४.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.